ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ६ एप्रिल, १९५५ | अंक १४

## विविध माहिती

**मानवी ज्ञान अत्यंत अपुरें**—प्रो. लो ह्या ब्रिटिश शास्त्रज्ञानें असें भाकीत केलें आहे कीं, कांहीं थोड्या वर्षांच्या आंतच मनुष्य तासाला ५,००० मैल ह्या वेगानें प्रवास करूं शकेल. अलीकडच्या काळांतील सर्वांत मोठा शोध कोणता ह्यासंबंधीं विचार करतांना त्यांनीं असें मत व्यक्त केलें कीं, माणसाला कोणत्याच विषयासंबंधीं जवळ जवळ कांहींच माहीत नाहीं, हाच तो शोध होय!

**रशिआंतील अणुनिर्मित वीजकेंद्र**—रशिआंत अणुशक्तीच्या साह्यानें चालणाऱ्या पहिल्या वीज-केंद्रांत २५,००० किलोवॅट वीज उत्पन्न करण्यांत येते. इतकी वीज निर्माण करण्यासाठीं कारखान्याला रोज काड्याच्या पेटीएवढें युरेनिअम लागतें. इतकीच वीज कोळशावर उत्पन्न करण्यासाठीं रोज १२ आगगाड्या कोळसा जाळावा लागेल, असा हिशोब करण्यांत आला आहे.

**नॉर्वेजिअन सरकारची शिष्यवृत्ति**—नॉर्वेजिअन सरकारनें १९५५–५६ सालांत एका भारतीय विद्यार्थ्यासाठीं शिष्यवृत्ति जाहीर केली आहे. शिष्यवृत्ति ८ महिनेपर्यंतच देण्यांत येईल. जो विद्यार्थी नॉर्वेमधील परिस्थितीचा अभ्यास करण्यास तयार होईल त्याला विशेष पसंत केलें जाईल. शिष्यवृत्ति सुमारें २,१३० रुपयांची आहे.

**विंध्य-प्रदेश राज्यांतील रस्ते**—विंध्य-प्रदेशाच्या सरकारनें राज्यांतील रस्त्यांचा विकास करण्याचा कार्यक्रम तयार केला आहे. १९५५–५६ सालांत रस्त्यांच्या वाढीच्या २४ योजना हातीं घेण्यांत येणार आहेत. ह्या सर्व योजनांना मिळून ६,७७,००० रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**रशिअन शास्त्रज्ञांचा शोध**—रशिआंतील शास्त्रज्ञांनीं मनुष्याच्या रक्त-प्रवाहांतील ऑक्सिजन मापणारें एक यंत्र शोधून काढलें आहे. छातीवरील व फुप्फुसावरील शस्त्रक्रिया चालू असतांना अगर भूल दिली असतांना रक्तामधील प्राणवायूचें प्रमाण ह्या यंत्राच्या साह्यानें सांगतां येतें. वनस्पतिजन्य औषधांचा परिणाम काय होतो, ह्याचाहि अभ्यास त्याच्या साह्यानें करतां येतो.

**बिर्ला विद्यालयाला मदत**—आनंद येथील बिर्ला विश्वकर्मा विद्यालय ह्या संस्थेला आर्थिक मदत देऊन तिचें देशांतील एका अद्ययावत् एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें रूपांतर करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. सरकारतर्फे कॉलेजला ५ लाख रुपयांचें कर्ज देण्यांत येणार असून शिवाय ४ लाख रुपये मदत म्हणून देण्यांत येणार आहे. गेल्या वर्षी सरकारनें ३ लाख रुपयांची मदत दिली होती.

**लांब धाग्याच्या कापसाचें उत्पादन**—प्रसिद्ध ब्रिटिश वनस्पतिशास्त्रज्ञ व कापूस-तज्ज्ञ मि. हार्सन ह्यांना भारतीय सरकारनें देशांतील कापूसविषयक संशोधन-केंद्रांची पहाणी करण्यासाठीं भारतांत बोलाविलें आहे. भारतांत लांब धाग्याचा कापूस बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निर्माण करतां येईल असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. सध्यां भारताला दरवर्षी ५० कोटी रुपये खर्चून ८ लाख टन लांब धाग्याचा कापूस आयात करावा लागतो.

**पोलाद घेण्यासाठीं मदत**—भारताला पोलादाचा अधिक पुरवठा करण्यासाठीं अमेरिका १·१८ कोटी डॉलर्स देणार आहे. ह्यासंबंधीं झालेल्या कराराप्रमाणें, भारताला ९८,२०० टन पोलादाचा पुरवठा करण्यांत येणार आहे. अशाच प्रकारचा करार गेल्या वर्षी करण्यांत आला होता व त्यांतील अटीप्रमाणें २,०५,००० टन पोलाद पुरविण्यांत आलें होतें.

**चहाच्या मळ्यावरील मजुरीचे दर**—सीलोनमधील चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या मजुरांच्या वेतनाची चौकशी करण्यासाठीं सीलोन सरकारनें एक बोर्ड नेमलें होतें. बोर्डानें मजुरांच्या वेतनांत २५ टक्के वाढ करण्यांत यावी अशी शिफारस केली होती. परंतु सध्यां धान्याच्या किंमती घसरत असल्यानें वेतनांत वाढ देणें योग्य ठरणार नाहीं, असें मत सरकारतर्फे व्यक्त करण्यांत आलें आहे.

**कलकत्ता ते अंदमान बोटीची वहातूक**—कलकत्ता ते अंदमान ह्या मार्गावर प्रवाशांची वहातूक करण्यासाठीं भारतीय सरकारनें विशाखापट्टम येथील कारखान्यांत ६,००० टन वजनाची एक बोट बांधण्याची मागणी नोंदविली आहे. बोटीला १४० लाख रुपये खर्च येईल, आणि तींत केबिनमधील ६८ उतारूंची व डेकवरील ५५० प्रवाशांची सोय करण्यांत येईल.

**पंजाब राज्यांत सिमेंटचा कारखाना**—चंदीगड जवळ सिमेंटचा कारखाना काढण्याचा पंजाबचें सरकार विचार करीत आहे. सरकारी मालकीच्या ह्या कारखान्याची योजना राज्य सरकारनें नुकतीच मंजूर केली असून आतां ती नियोजन-समितीकडे अनुमोदनासाठीं पाठविण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं ३ कोटी रुपये भांडवल लागेल.

**कर-चौकशी समितीचा अहवाल**—भारतीय सरकारनें नेमलेल्या कर-चौकशी समितीचा अहवाल छापण्यास सुमारें ८४,००० रुपये लागतील, अशी माहिती अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं राज्यसभेंत सांगितली. ते पुढें म्हणाले कीं, अहवालाच्या १२,००० प्रती काढण्यांत आल्या असून त्यांपैकी ९,५०० प्रती विक्रीसाठीं आहेत.

**अमेरिकन तूप कलकत्त्यांत आलें**—अमेरिकन लोण्यापासून बनविलेलें ४०,००० मण तूप कलकत्ता बंदरांत येऊन दाखल झालें आहे. हें सर्व तूप अमेरिकन लोकांनीं भारतीय लोकांना देणगी म्हणून दिलें असल्याचें समजतें. अमेरिकेंतील वॉर:सार्व्हिसतर्फे ही देणगी पाठविण्यांत आली आहे. तुपाचें वांटप फक्त गरीब लोकांतच करण्यांत येणार आहे.

**भारतीय कोळशाला ऑस्ट्रेलियाची मागणी ?**—मेलबोर्न गॅस अँड फ्युएल कॉर्पोरेशन, भारताकडून गॅस निर्माण करण्यास उपयुक्त अशा प्रकारचा २०,००० टन कोळसा विकत घेण्याचा विचार करीत आहे. व्हिक्टोरिआ प्रांताला साउथ वेल्सकडून कोळशाचा पुरवठा होतो. पण नुकत्याच झालेल्या पुरामुळें कोळशाच्या खाणी नाकाम झाल्या आहेत. तथापि, खाणींतून कोळसा काढणें शक्य झाल्यास परदेशीय कोळसा घेण्यांत येणार नाहीं, असें समजतें.

**रशिआची तांत्रिक मदत**—संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या तांत्रिक मदतीच्या योजनेला आपण हातभार लावूं, असें १९५२ सालीं रशिआनें जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें रशिआनें संघटनेकडे ४० लाख रुबल्स म्हणजे सुमारें ६१,२४,००० रुपये पाठविले आहेत. सीलोन, युक्वेडोर, भारत, जॉर्डन, पाकिस्तान आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांनीं रशिआची तांत्रिक मदत घेण्याचें कबूल केलें आहे.

**आरोग्यविषयक सहकारी संस्था**—मंगलोर येथील नागरिकांनीं सहकारी तत्त्वावर सार्वजनिक आरोग्याचें रक्षण करणारी संस्था काढण्याचें ठरविलें आहे. संस्थेचें नांव मंगलोर हेल्थ कोऑपरेटिव्ह सोसायटी असें असून तिचें भाग-भांडवल १,००,००० रुपयांचें आहे. सभासदांना स्वस्ताईनें औषधोपचार करणें, मुलांच्या आरोग्याचीं केंद्रें काढणें, प्रसूतिगृहें चालविणें, शहर स्वच्छ राखणें, इत्यादि कामें संस्था करणार आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

**॥ सत्य संकल्पाचा दाता नारायण ॥** तुकाराम महाराज

## ☆ मुख्य साखरेचें उत्पादन ☆

**आज ८० हजार पोतीं साखर तयार झाली आहे. चालू हंगामांत एक लक्षापेक्षा जास्त पोतीं साखर तयार होईल**

**कारण**

**साखरेचा उतारा आज तारखेपर्यंत १२% ( बारा टक्के ) आहे.**

**सिंडिकेटकडे असलेल्या ठेवींचा तपशील.**

| | |
|---|---|
| ता. ३०-९-१९५१ अखेर सिंडिकेटकडे असलेल्या ठेवी | रु. १,०२,९९,१५० |
| ता. ११ मार्च १९५५ पर्यंत परत केलेल्या ठेवी | रु. ५५,२६,४३४ |
| ता. ११ मार्च १९५५ पर्यंत सिंडिकेटकडे असलेल्या ठेवी | रु. ४७,७२,७१६ |

वाढलेल्या साखरेच्या उत्पादनामुळें सिंडिकेट जास्त नफ्यांत चालेल. ठेवी सुरक्षित आहेत. ६ ते ७½ टक्क्याप्रमाणें दर सहा महिन्यांनीं व्याज दिलें जातें हें समजण्याइतका मध्यमवर्ग चिकित्सक आहे. यामुळें ४८ लक्षांपैकी ३८ लक्ष रुपयांच्या ठेवींची मुदत ठेवीदारांनीं एक, तीन, पांच वर्षें अशी वाढवून दिली आहे. राहिलेल्या ठेवींपैकी मंगलकार्य, शिक्षण यांकरितां कांहीं ठेवी परत कराव्या लागतील. बाकीच्या ठेवींची मुदत वाढवून मिळेल.

सरकारी देणें बाकी १६ लक्ष रुपये ३१ मे १९५५ पर्यंत सर्व दिली जाईल. पुढील हंगामांत सरकारी देणें बाकी नसल्यामुळें एक वर्ष मुदतीच्या ठेवी परत करतां येतील व याप्रमाणें सर्व ठेवी परत होऊन सिंडिकेट ठेवीदारांच्या कर्णांतून मुक्त होईल.

**साखरेचें कायमचें वाढलेलें उत्पादन व्याजासह सर्व ठेवी परत करील अशी खात्री होती व आहे.**

सर्व युगांत " मंबाजीबुवा " असतात. शेटजींचे द्रव्यार्थी " मंबाजीबुवा " भुंकत असल्यास " भुंको बापडे " असा तुकाराममहाराजांचा उपदेश आहे.

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,<br>९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.<br>दि. २१-३-१९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,<br>मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ६ एप्रिल, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधीं सूचना

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत येणारीं उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. शांतिलाल मंगळदास ह्यांनीं कांहीं सूचना केल्या आहेत. त्यांचा मथितार्थ पुढीलप्रमाणें आहे. (१) दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारी व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांच्या विकासावर विशेष जोर देण्यांत यावा. (२) रेल्वे व रस्ते ह्यांच्या साह्यानें होणाऱ्या वहातुकीचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणावर करण्यांत यावा. कोणतेंहि साधारण मोठेसें खेडें रेल्वेस्टेशनपासून अगर एखाद्या पक्क्या रस्त्यापासून पांच मैलांपेक्षा अधिक दूर असूं नये अशी व्यवस्था करण्यांत यावी. असें केल्यानें खेडीं बाजारपेठांशीं जोडलीं जातील. (३) सध्यां देशाच्या औद्योगिक जीवनाचा विस्तार करण्यांत येत आहे. अशा परिस्थितींत ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंवर जरूर नसणारे कर घेण्यांत येऊं नयेत व त्यांचा पुरवठा समाधानकारक करण्यांत यावा. (४) सरकारी कराची पद्धति अशा तऱ्हेची ठेवावी अगर तींत असा बदल करण्यांत यावा, कीं देशांत स्वेच्छेनें बचत करून जो पैसा जमेल त्याला परकीय भांडवलाची विनाशर्त जोड मिळावी. (५) खाजगी उद्योगधंद्यांना त्यांच्या मर्यादेंत पूर्णपणें वाव देण्यांत यावा. श्री. मंगळदास ह्यांनीं योजनेसंबंधीं आणखीहि कांहीं विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात कीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पाणीपुरवठा व वीजपुरवठा ह्यांच्यावरील कर कमी करून तो उद्योगधंदे व वहातूक ह्यांच्यावर देण्यांत यावा. सध्यां अशी परिस्थिति उद्भवली आहे कीं सरकारच्या अनिष्ट करविषयक धोरणामुळें खाजगी बचत व संस्थांच्यातर्फे होणारी बचत हीं दोन्हींहि कमी झालीं आहेत. खाजगी उद्योगधंद्यांची स्थिति पंख तोडलेल्या पक्षासारखी झाली आहे. मरणाची भीति घालून, पंख तोडलेल्या अवस्थेंत त्यांना आकाशगमन करण्यास सांगण्यांत येत आहे.

## कॉमनवेल्थ गटांतील व्यापारांत चहाचें स्थान

लंडन येथील कॉमनवेल्थ इकॉनॉमिक कमिटीनें ह्या राष्ट्रगटांतील मळ्यांत होणाऱ्या पिकासंबंधीं एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालांत चहाचें उत्पादन, खप, निर्यात व किंमती ह्यासंबंधानें उपयुक्त माहिती ग्रथित करण्यांत आली आहे. जगांतील सर्व देशांपेक्षा ब्रिटनमध्यें चहाचा दरडोई खप अधिक आहे. १९५३ सालीं ब्रिटनमध्यें चहाच्या खपाची दरडोई सरासरी ९.४ पौंड इतकी पडली. युद्धापूर्वीचा सरासरी खप ९.३ पौंड असा होता. १९५३ सालीं चहाच्या निर्यातीनेंहि उच्चांक गांठला. ह्या वर्षी १०० कोटी पौंडांपेक्षा अधिक चहा तो उत्पादन करणाऱ्या देशांनीं निर्यात केला. निर्यातीच्या बाबतींत भारताला १९४९ साल सर्वांत चांगलें गेलें होतें. चहाचा व्यापार मुख्यतः कॉमनवेल्थ गटांतील राष्ट्रांतच मुख्यतः होतो. राष्ट्रगटाच्या बाहेरचा, चहाची निर्यात मोठ्या प्रमाणावर करणारा देश एकच आहे. तो म्हणजे इंडोनेशिआ, त्याचप्रमाणें राष्ट्रगटाच्या बाहेरील मोठ्या प्रमाणावर आयात करणारा देश अमेरिका हा आहे. १९५३ सालीं चहाचें उत्पादन पुन्हां सुधारलें. युद्धापूर्वीच्या चहाच्या उत्पादनापेक्षा १९५३ सालचें उत्पादन एकपंचमांशानें अधिक झालें. १९५४ च्या मार्चअखेर भारतांत चहाची लागवड ७,३०,००० एकरामध्यें होत होती. चहाच्या आयातीपैकीं निम्म्यापेक्षा अधिक आयात ब्रिटन करतें. ब्रिटनखेरीज अमेरिकेसारख्या कांहीं देशांतहि चहाची आयात १९५३ सालीं बरीच वाढलेली दिसून येते. ब्रिटनमध्यें चहाचा खप वाढत असल्यामुळें १९५३ सालीं चहाच्या किंमती १९५१ सालच्या किंमतीच्या पातळीपर्यंत चढल्या. १९५४ सालींहि चहाच्या किंमती वाढतच गेल्या. त्यांतल्या त्यांत भारतीय चहाच्या किंमती अधिक वाढल्या. चहा निर्यात करणाऱ्या देशांतील किंमती व निर्यातीच्या किंमती ह्यांच्यांतील फरक १९५३ सालीं कमी झाला.

## जल-वहातुकीचें आणखी एक दालन

भारताचे रेल्वेमंत्री श्री. लाल बहादूर शास्त्री ह्यांनीं उज्जयिनी नजीक क्षिप्रा नदीवर बांधावयाच्या नवीन पुलाच्या पायाचा दगड नुकताच बसविला. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं आसामपासून अलाहाबादपर्यंतच्या मोठ्या नद्यांवर मोटारबोटींची वहातूक सुरू करण्याचा सरकार विचार करीत आहे. ह्या बोटी अशा प्रकारच्या तयार करण्यांत येतील कीं त्यांचा उपयोग सर्व वर्षभर करतां यावा व त्यांच्या साह्यानें उतारूंची व मालाची ने-आण करतां यावी. बोटींचा नमुना कशा प्रकारचा असावा तें सुचविण्यासाठीं एका अमेरिकन तज्ज्ञाला पाचारण करण्यांत येत आहे. त्यानें सुचविलेल्या नमुन्याप्रमाणें योग्य अशा बोटी बांधण्याचा सरकारचा बेत आहे. रेल्वेवर मालाच्या वहातुकीची पुष्कळदां खेचाखेच होते. रेल्वेबरोबरच समुद्रमार्गानें व नद्यांच्या पात्रांतून जर मालाची वहातूक करण्यांत आली तर खेचाखेच कमी होईल. देशाच्या वहातुकीच्या सर्व गरजा फक्त रेल्वे भागवूं शकणार नाहीं. म्हणून मालाच्या व प्रवाशांच्या वहातुकीला जलमार्गाचें व रस्त्यावरील वहातुकीचें साह्य घेण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. हें साध्य होण्यासाठीं अधिक रस्ते तयार करणें आणि अधिक ठिकाणीं पूल बांधणें ह्या गोष्टींची आवश्यकता आहे. १ एप्रिल, १९५५ पासून भारताच्या किनाऱ्यानें होणारी सर्व वहातूक हिंदी बोटींतून करण्यांत यावी अशी सक्ति सरकार करणार आहे, देशांतील एका बंदरापासून दुसऱ्या बंदरापर्यंत माल अगर प्रवासी ह्यांची वहातूक करण्यास कोणत्याहि परदेशी बोटीला परवानगी देण्यांत येणार नाहीं. किनाऱ्यावरील वहातूक हिंदी बोटींतून करण्यासाठीं अधिक बोटींची गरज आहे ह्याची सरकारला जाणीव आहे. ही गरज भागविण्यासाठीं अधिक बोटी उपलब्ध करून देण्याच्या योजना सरकार आखीत आहे.

## १९५४ मधील व्यापार-उद्योगांतील वाढ

### मध्यवर्ती व्यापार आणि उद्योगखात्याचा अहवाल

व्यापार आणि उद्योगधंद्यांत निर्माण झालेलें स्थैर्य आणि उत्पादनांत सर्वांगीण सुधारणा हीं १९५३ मधील वैशिष्ट्यें १९५४ सालीं अधिक स्पष्टपणें दृग्गोचर झालीं. या कालांत उत्पादनांत विशेष वाढ झाली. औद्योगिक उत्पादनाचा ५३ मधील निर्देशांक १३५·३ होता तो ५४ मध्यें १४५ पर्यंत गेला, तर सर्वसाधारण किंमतमानाच्या निर्देशांकांत जानेवारी ५४ मधील ३९९·६ वरून डिसेंबर ५४ मध्यें ३६७·८ पर्यंत घट झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कापड व सीमेंट यांच्या उत्पादनाच्या ठरलेल्या लक्ष्यापेक्षा अधिक उत्पादन झालें. १२,२६,००० टन हें तयार पोलादाचे उत्पादन म्हणजे एक नवा अभूतपूर्व विक्रमच होय. हा आंकडा गतवर्षीपेक्षा २ लाख टनांनीं अधिक आहे. तागी मालाचें उत्पादन ५३ पेक्षा ५०,००० टनांनीं वाढलें. इंजिनियरिंग धंद्यांत ६२ पैकी ५६ धंद्यांच्या उत्पादनांत वाढ झाली. चांगलीं पिकें व सुधारलेली आर्थिक परिस्थिति यामुळें मालाच्या मागणींत वाढ झाली. यामुळेंच उत्पादनांतहि वाढ करणें शक्य झालें.

मागील कोणत्याहि वर्षांपेक्षा ५४ मध्यें औद्योगिक विकासास अधिक अनुकूल परिस्थिति होती. नवीन कारखाने काढण्यास वा चालू कारखान्यांचा विकास करण्यास ५३ मध्यें १८२ परवाने देण्यांत आले, तर ५४ मध्यें नव्या कारखान्यांसाठी ११० व चालू कारखान्यांच्या विकासाकरितां २२६ परवाने देण्यांत आले.

### नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलूपमेंट कॉर्पोरेशन

औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्यासाठीं करण्यांत आलेली एक महत्त्वाची उपाययोजना म्हणजे दि नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. ची स्थापना. हें कॉर्पोरेशन सरकारची संमति घेऊन नव्या उद्योगधंद्यांच्या विकासाच्या योजना आंखील. या कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांच्या पहिल्या बैठकींत चौकशी करण्याच्या उद्योगधंद्यांची यादी तयार करण्यांत आली आहे.

### छोटे उद्योगधंदे

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उद्योगधंद्यांत गुंतविलें जाणारें मोठें भांडवल लक्षांत घेता, बेकारीचा प्रश्न सोडविण्यास त्याचा उपयोग होईल असें वाटतें. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांनीं हा प्रश्न सुटणार नाहीं हें ओळखून सरकारनें यावर्षी घरगुती आणि छोट्या उद्योगधंद्यांकडे विशेष लक्ष दिलें. फोर्ड फाउण्डेशन टीमच्या शिफारशीनुसार सरकारनें छोट्या उद्योगधंद्यांसाठी चार प्रादेशिक तंत्रविद्याविषयक संस्था स्थापण्याचें ठरविलें. या धंद्यांतील तंत्रांत सुधारणा करून त्यांस पैशाचें पाठबळ मिळावें म्हणून यावर्षी एका स्मॉल स्केल इंडस्ट्रिज कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली. या संस्थांच्या कामांत एकसूत्रता आणण्यासाठी व विकासाचा कार्यक्रम पार पाडण्याकरितां एका स्मॉल स्केल इंडस्ट्रीज बोर्डाचीहि स्थापना झाली आहे.

### खादी व ग्रामोद्योग

अ. भा. खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि अ. भा. हस्तकला मंडळ यांचे द्वारां खादी व ग्रामोद्योगांच्या विकासाकडे खास लक्ष या वर्षी पुरविण्यांत आलें. यंदां खादीचें उत्पादन ३ कोटी रु. वर गेलें. १९५३-५४ चा हा आंकडा १·४ कोटी रु. होता. घरगुती उद्योगधंद्यांतील सर्वांत मोठ्या अशा हातमाग धंद्यालाहि १९५३ पासून ६ कोटी रुपयांहून अधिक मदत मंजूर झाली. या धंद्यास चालू आर्थिक वर्षांत कर्जे व मदतीच्या स्वरूपांत सरकारनें ८ कोटी रु. वर मदत केली; १९५२-५३ ला संपलेल्या ४ वर्षांत हा आंकडा केवळ ५० लाख रु. होता. यावरून सरकार घरगुती व छोट्या धंद्यांस किती महत्त्व देत आहे तें दिसून येतें.

### परदेशांबरोबरचा व्यापार

परकीय हुंडणावळीची परिस्थिति गतवर्षाप्रमाणें यंदाहि स्थिर राहिल्या कारणानें अनेक आवश्यक वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध काढण्याचें वा सैल करण्याचें धोरण तसेंच पुढें चालू ठेवतां आलें. निर्यात व्यापार वाढविण्यासाठींहि या वर्षी खास उपाय योजण्यांत आले. या वर्षीची निर्यात गतवर्षीपेक्षा ३१ कोटी रु. नीं जास्त आहे. १९५३ शीं तुलना करतां आयात-निर्यात व्यापाराचें प्रमाण व किंमत यंदा जास्त होती. मालाची सढळपणें आयात करूं देण्याच्या धोरणानें आयात परवान्यांसाठी करण्यांत आलेल्या अर्जांची संख्या ५३ मधील १·८ लाखांवरून ५४ मध्यें २·२ लाखांवर गेली. यांतील फक्त ८०० अर्ज वर्षअखेरीस निकालांत काढावयाचे होते.

### निर्यात व्यापारांत वाढ

निर्यात व्यापारावर यावर्षी सतत लक्ष ठेवण्यांत आलें होतें. आवश्यक आणि शक्य तेथें परवान्यावरील निर्बंध काढण्याचे उपाय योजण्यांत आले. अनेक वस्तूंवरील नियंत्रणें काढण्यांत आलीं वा त्यासाठी सर्वसाधारण खुले परवाने देण्यांत आले. तांदूळ, डाळी, यांसारख्या वस्तूंवरील निर्यातीस ५३ मध्यें असलेली बंदी काढण्यांत येऊन त्यांच्या निर्यातीचे परवाने देण्यांत आले. या वर्षांत गिरणी कापडासाठी एक व रेशीम रेयॉनसाठी एक मिळून दोन निर्यात विकासमंडळें स्थापण्यांत आलीं आहेत.

भारतीय तंबाखूची अतिपूर्वेकडील देशांत निर्यात करण्याची शक्याशक्यता अजमाविण्यासाठीं तंबाखू-उत्पादक व व्यापारी यांचें एक शिष्टमंडळ त्या देशांत पाठविण्यांत आलें होतें. चीनकडे २,००० टन तंबाखूची निर्यात करूं देण्यांत या शिष्टमंडळास यश आलें. १९५३ मधील व्यापार करार या वर्षीहि पुढें चालू ठेवण्यांत आले. चीन आणि रुमानिया या देशांशीं नवे व्यापार-करार झाले तर पूर्व जर्मनीशीं एक अनौपचारिक व्यापार करार झाला. चीनशीं करार झाल्यावर लगेच ९० टन कच्च्या रेशमाच्या आयातीचे बदल्यांत ९ कोटी रत्तल तंबाखूच्या निर्यातीची व्यवस्था करण्यांत आली.

### परदेशीयांच्या कंपन्यांत भारतीय नोकरवर्गाचें वाढतें प्रमाण

देशांतील परकीय कंपन्यांत नोकरीवर असणारे भारतीय व परकीय यांचा विचार करतां या कंपन्यांतील भारतीयांचें प्रमाण १ जानेवारी १९५४ ला ७०·६% वर गेलें, १९५२ मध्यें तें ६५·३% होतें. पगाराच्या दृष्टीनें विचार करतां सर्वांत कमी पगाराच्या गटांत म्हणजे ३०० ते ४९९ रु. उत्पन्नाच्या गटांत भारतीयांचें प्रमाण ९८·८ टक्के, ५०० ते ९९९ रु. चे गटांत ५२ मधील ८५ टक्क्यांवरून ५४ मध्यें ९२ टक्क्यांवर गेलें. १००० रु. व त्यावरील पगाराच्या गटांत भारतीयांचें प्रमाण एकूण जागांच्या १/३ पेक्षाहि कमी आहे; मात्र हें प्रमाण ५२ मध्यें २४ टक्के होतें तें ५४ मध्यें ३२ टक्क्यांपर्यंत गेलें आहे.

## भोर स्टेट बँक लि., भोर

### वार्षिक सभेंत श्री. म. द्यं. शिंगरे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

सन १९५४ च्या ताळेबंदाकडे पाहतां आपणांस असें दिसून येईल कीं, आपलें भागांचें भांडवल रुपये अर्धांच लक्षांचें असून रिझर्व्ह फंड व इतर फंड रु. ६९,८७२ आहेत. आपल्याकडे असलेल्या सर्व प्रकारच्या ठेवी रुपये बारा लक्ष दहा हजारांचेवर आहेत. ही ठेवीची रक्कम गेले सालपेक्षा सुमारें तीस हजारांनीं जास्त आहे. सध्याचे आर्थिक मंदीचे दिवसांत, व सरकारनें शक्य तेवढा पैसा आपले नियंत्रणाखालीं आणण्याचा प्रयत्न चालूं ठेवला असतां संयुक्त भांडवली बँकांकडे ठेवी वाढणें हें एक विश्वासाचें गमक आहे. या दृष्टीनें आपल्या बँकेनें ठेवीदार व खातेदार यांचा संपूर्ण विश्वास संपादन केला आहे हें नमूद करण्यास आनंद व समाधान वाटत आहे. सन १९४९ सालापासून आपल्या बँकेची प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल—

| सन | एकूण ठेवी | दिलेलीं कर्जें | निव्वळ फायदा |
|---|---|---|---|
| १९४९ | ९,८३,७८९ | ६,६९,७६४ | १३,०२१ |
| १९५० | ९,८७,२३४ | ५,७९,५७२ | ७,७७५ |
| १९५१ | ११,६०,७४६ | ६,४६,६०७ | ७,४५५ |
| १९५२ | ११,१५,५२६ | ६,६९,४१२ | ७,१४४ |
| १९५३ | ११,८९,६०५ | ६,६४,३०३ | ६०३ |
| १९५४ | १२,१०,५७७ | ६,०९,८९२ | ९,७९७ |

### पोषक कायदे व वातावरण हवें

रिझर्व्ह बँकेनें आतां सर्वच बँकांवर सारख्या प्रमाणांत नियंत्रण ठेवलें आहे. या नियंत्रणामध्यें कर्जे अगर कॅश क्रेडिट देण्याबाबतच्या धोरणाचाहि समावेश होतो. वास्तविक शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड असा फरक असतांना एकाच धोरणानें सर्व बँकांकडे पाहणें इष्ट नाहीं. ज्या लहान बँका खेड्यांत काम करीत आहेत अगर निमशहरी व्यवहार करीत आहेत त्यांचेबाबत स्वतंत्र धोरण असणें इष्ट आहे व नियंत्रण असल्यास त्या दृष्टीनें प्रत्यक्ष मदतहि असणें जरूर आहे. आपल्या देशाचा आर्थिक व्यवहार व परिस्थिति पाहतां देशांत बँकिंगला फार मोठें स्थान आहे आणि या दृष्टीनें बँकिंगचा अजून पुष्कळच प्रसार व्हावयाचा आहे. सहकारी चळवळीस सर्वांचा, सरकारचा व रिझर्व्ह बँकेचा पाठिंबा असतांनासुद्धां त्यांना एकंदर गरजेच्या ३ टक्केपेक्षा जास्त कर्ज शेतकऱ्यांस देतां आलें नाहीं. अशा परिस्थितींत सहकारी बँकांप्रमाणेंच संयुक्त भांडवली बँकांची वाढ व जोपासना करणें जरूर आहे; आणि या दृष्टीनें सरकार व रिझर्व्ह बँकेनें बँकांकडे पाहिलें पाहिजे. बँकिंगचे बाबतची जातवारी, अगर प्रतवारी असतां उपयोगी नाहीं. त्या संस्था कार्यक्षम व उपयुक्त होण्याचे दृष्टीनें त्यांस सक्रिय मार्गदर्शन व्हावयास पाहिजे. त्यासाठी योग्य व पोषक असे कायदे व वातावरण निर्माण झालें पाहिजे.

### प्रकट चर्चा व प्रसिद्धि हवी

ग्रामीण पतपेढीपाहणीचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे व तो जरी मुख्यतः शेती पतपेढ्यांसंबंधीं असला तरी त्यांत उपाययोजना करतांना संयुक्त भांडवली बँकांचा संबंध आला आहे. एक नवीन स्टेट बँक करून व त्यांत कांहीं मोठ्या स्टेट असोसिएटेड ( State associated ) बँका विलीन करून त्या बँकेच्या शाखा सर्वत्र वाढविण्याची सूचना आहे. याप्रमाणें व्यवस्था होईल, परंतु असें करीत असतांना त्या बँकेस प्राधान्य व कांहीं अंशीं मक्तेदारी मिळेल. या बँकेकडून लहान लहान व्यापारी व उद्योगधंदे यांना कितपत साहाय्य मिळेल असा प्रश्न राहतो. एवढेंच नव्हे तर स्थानिक पुढारीपणा व केवळ तळमळीनें काम करून ज्यांनीं संस्था भरभराटीस आणल्या त्यांचें स्थान काय ? असा प्रश्न उभा राहतो. आमचे मतें सरकारनें वरील अहवालाचा विचार करून त्याबाबत उपाययोजना करण्यापूर्वी देशांतील सर्व बँकांच्या प्रतिनिधींची सभा घेऊन त्यांना विश्वासांत घेऊन नंतरच निर्णय घ्यावा. आज अशी साधार भीति वाटते कीं, सध्या अस्तित्वांत असलेले अनेक कायदे असे आहेत कीं, त्यामुळें पतीवर अगर जिंदगीवर कर्जरूपानें पैसा मिळत नाहीं. बिनपतवान शेतकऱ्यास पैसा उपलब्ध व्हावा असें म्हणत असतां समाजांतील पतवान जनतेस पैसा उपलब्ध होऊं नये हें आश्चर्यकारक वाटतें. बँकिंग हा व्यवहार विश्वासावर आधारलेला आहे. संचालक मंडळ हा कारभार प्रामाणिकपणानें व निष्ठेनें चालवितें आणि आतां तर रिझर्व बँकेचें नियंत्रणच आहे. अशा परिस्थितींत समाजांत कोठल्याहि घटनेसंबंधीं न कळत चर्चा होणें चांगलें नाहीं व केवळ अर्धवट माहितीच्या आधारावर ती चर्चा करणें अयोग्यच आहे. परंतु आपल्याकडे अशी चर्चा करण्यांत भूषण मानलें जातें आणि याकरतां खरोखर ज्याप्रमाणें देशांत बँकिंगला एक प्रकारचें विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न चालू आहे त्याप्रमाणें समाजांत बँकिंगबाबत स्पष्ट कल्पना याव्यात या दृष्टीनें अधिकृत अशी प्रसिद्धीची योजना पाहिजे. त्याचा रिझर्व बँक व सरकारनें अवश्य विचार करावा.

### सल्लयाच्या यंत्रणेची आवश्यकता

रिझर्व बँकेनें बँकिंग कायद्याखालीं आपणाकडे मार्गदर्शन व नियंत्रण घेतलें. परंतु त्याबाबत त्यांनीं देशांतील बँकिंग प्रतिनिधींबरोबर वेळोवेळीं चर्चा करण्याची यंत्रणा निर्माण केली नाहीं. ज्या ज्या वेळीं एखादी अधिकृत संस्था नियंत्रणाचे अधिकार आपणांकडे घेते त्यावेळीं ज्यांचेवर नियंत्रण करावयाचें त्यांचे प्रतिनिधींना वेळोवेळीं बोलावून चर्चा करणें हें इष्ट ठरतें. उदाहरणार्थ, विमा कंपन्या अगर चार्टर्ड अकौंटंटस् यांच्या अधिकृत कौन्सिलकडे सल्लामसलतीची व्यवस्था आहे तशीच व्यवस्था रिझर्व बँकेनें करावी म्हणजे बँकांच्या दैनंदिन अडचणींचा विचार होऊं शकेल.

### मुख्य कचेरीसाठी इमारत

आपल्या बँकेची आर्थिक परिस्थिति व व्यवहार उत्तम व बँकिंग पद्धतीस अनुसरून असे आहेत व अहवालावरून सुद्धां खरी वस्तुस्थिति लक्षांत येईल. या संस्थेंत आज काम करणारें संचालक मंडळ केवळ कर्तव्यबुद्धीनें व निःस्वार्थीपणानें व कळकळीनें काम करीत आहे व संस्थेची उत्तरोत्तर भरभराट व्हावी असा त्यांचा सतत प्रयत्न चालू आहे. बदललेली परिस्थिति व कायदे यांची सांगड घालून व शक्य तितक्या काटकसरीनें व्यवहार चालविला आहे. त्यांत हेतु एकच कीं आपल्या पूर्वीच्या संस्थानची ही एक संस्था असून त्याद्वारां तरी आपणां सर्वांची सेवा घडण्याचा योग यावा आणि या दृष्टीनें आपण सर्व भागीदार व खातेदार सहकार्य देतां याबद्दल बोर्ड आपलें फार आभारी आहे. बोर्डानें नुकतेच भोर येथें नवीन सरकारी ट्रेझरीचेजवळ अगदी योग्य किंमतींत एक घर घेतलें असून तेथें बँकेचे उपयुक्ततेचे दृष्टीनें त्या इमारतींत फेरफार करण्याचा अगर नवीन बांधण्याचा विचार आहे. त्यामुळें आपल्या बँकेच्या प्रगतींत भर पडेल असा विश्वास आहे. आपल्या बोर्डानें पाली, शिरवळ शाखेप्रमाणेंच भोर येथेंहि वजनदार प्रतिष्ठित मंडळींचें सल्लागार मंडळ नेमलें आहे. याचा उपयोग बँकेचे प्रगतीस होईल असा विश्वास आहे.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

ही बँक आतां १९ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. आज या बँकेचें भांडवल रु. ४,३५,१५० रिझर्व्ह फंड रु. १,०१,१०० एकूण ठेवी रुपये २५,३३,७४३ व खेळतें भांडवल रुपये ३७,०५,४७६ एवढें आहे. या वर्षी बँकेस एकंदर खर्च वजा जातां रुपये २८,००० निव्वळ नफा झाला आहे. तोच मागील वर्षी रु. २३,००० होता. त्यांपैकी रु. १३,०७७ मागील बुडीत येणें खर्च घालून राहिलेलें रु. १५,७९९ सरकारी कर्जरोख्यांतील कमी झालेल्या किमतीसाठी जमा करावेत अशी डायरेक्टर-बोर्डानें शिफारस केली आहे. या वर्षी मुदती ठेवींत, सेव्हिंग्ज डिपॉझिटमध्यें वाढ झालेली दिसून येते, त्यावरून जनतेचा या बँकेवरील विश्वास वाढत आहे असें म्हणणेस हरकत नाहीं. बँकेचे सर्व रोखे १० वर्षांत रोख पैसे मिळणारे झाले असून बँकेचा पाया त्यामुळें मजबूत झाला आहे. बँकेची स्वतःची बैलहोंगल येथें एक इमारत झाली असून त्याचप्रमाणें बेळगांव येथें एक भव्य इमारत या वर्षापासून बांधणेस सुरवात करणेचा चालकांचा विचार आहे.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४,१३,९३० | रोख, बँकांत | ४,४२,४९० |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,०१,१०० | इनव्हेस्टमेंटस् | १३,०६,१०३ |
| ठेवी | २५,३३,७२९ | कर्जे | १६,५१,८१७ |

## दि बँक ऑफ सिटिझन्सची वार्षिक सभा

दि बँक ऑफ सिटीझन्स लि. बेळगांव या बँकेच्या भागीदारांची वार्षिक सभा बँकेच्या मुख्य कचेरींत १५१४, मारुतिगल्ली, बेळगांव येथें रविवार ता. २७-३-५५ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां श्री. जी. डी. सराफ यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. स्थानिक व बाहेरील सुमारें शंभर सभासद सभेस उपस्थित होते.

बँकेचे जनरल मॅनेजर यांनीं सभेची नोटीस वाचून दाखविल्यावर श्री. जी. डी. सराफ यांचें प्रास्ताविक भाषण झालें, व ३१-१२-५४ अखेर ताळेबंद व नफातोटापत्रक एकमतानें पास केलें गेलें. नंतर डायरेक्टर्स श्री. काशीनाथ यशवंत देशपांडे, श्री. सी. एल. पट्टणशेट्टी, श्री. सी. जी. हेरेकर, रावसाहेब के. आर. पाटील, श्री. जी. डी. सराफ, श्री. ए. ए. बंदूकवाला हे पुन्हां डायरेक्टर बोर्डावर निवडून आले. श्री. बी. व्ही. वरेरकर, चारटर्ड अकाउंटंट, मुंबई, यांची पुढील वर्षाकरितां ऑडिटर्स म्हणून निवडणूक झाली.

यानंतर बँकेचे एक डायरेक्टर श्री. पी. बी. उगरगोळ हे ऑल इंडिया कोऑपरेटिव्ह युनियन, दिल्लीच्या एक्झिक्यूटिव्ह कमिटीचे डायरेक्टर म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणेंत आलें, व श्री. एम. एस. होसमनी यांनीं डायरेक्टर्स, शेअरहोल्डर्स व स्टाफ यांच्या वतीनें त्यांना पुष्पहार अर्पण केला. नंतर श्री. पी. बी. उगरगोळ यांचें आभारप्रदर्शनार्थ भाषण झालें, व श्री. गौरी यांनीं अध्यक्षांचे आभार मानलेवर अल्पोपहार झाल्यावर सभेचें कामकाज संपलें.

तावडतोब बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा भरून श्री. जी. डी. सराफ यांना पुढील वर्षाकरितां चेअरमन म्हणून एकमतानें निवडल्याचें जाहीर केलें गेलें.


# दि बॉम्बे स्टेट
# को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ 
३८,३८२

पोस्ट बॉक्स नं. ४७२ 
तारेचा पत्ता : फार्मरबँक

हा बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७१,२७,००० |

## १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, दौंड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यांखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अविकसित देशांची औद्योगिक प्रगति

युनायटेड नेशन्सच्या इकॉनॉमिक अँड सोशल अफेअर्स खात्यानें तयार केलेला अविकसित देशांच्या औद्योगिक प्रगतिबाबत व समस्यांबाबत अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्या अहवालांतील निष्कर्ष आपल्या देशांतील परिस्थितीशीं ताडून पाहणें बोधप्रद ठरेल. युरोपांतील देश औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले आहेत, त्यांच्या ज्या चुका झाल्या, त्या अविकसित देशांना टाळतां येतील. ही एक फायद्याची बाब अहवाल तयार करणाऱ्या तज्ज्ञांना आढळून आली. अविकसित देशांतील सामाजिक व आर्थिक वातावरण कित्येक दृष्टींनीं औद्योगिक प्रगतीस पोषक नसतें, त्यामुळें तेथील सरकारांना युरोपीय देशांतील सरकारांपेक्षां अधिक निर्णायक व उपकारक असें औद्योगिक धोरण आखावें लागेल हें क्रमप्राप्त आहे. कित्येक देशांच्या सरकारांनीं औद्योगिक विकासावर सर्व लक्ष केंद्रित करून, आर्थिक प्रगतीच्या इतर घटकांकडे दुर्लक्ष केलें आहे. वास्तविक शेतीची प्रगति औद्योगिक प्रगतीच्या आधीं, निदान तिच्या समवेत तरी, व्हावयास हवी. ज्या देशांत प्राप्तीचें मान अगदीं खालच्या पातळीचें आहे व लोकसंख्येची वाढ मात्र झपाट्यानें होत आहे, अशा देशांतून बचत आणि पुरेशी गुंतवणूक ह्या बाबी अवघड होऊन बसतात. म्हणून सरकारनें सेव्हिंग्ज बँका, इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन्स, इत्यादि संघटनांना प्रोत्साहन देऊन कारखानदारीकडे पैशाचा ओघ वळविला पाहिजे. आशियांतील कांहीं देशांत ग्रामोद्योगांवर फार मोठ्या लोकसंख्येचा चरितार्थ अवलंबून असतो, व त्या उद्योगांचा औद्योगिक प्रगतीशीं समन्वय घडवून आणणें आवश्यक होतें. ग्रामोद्योगांशीं स्पर्धा करणाऱ्या कारखानदारीला अग्रस्थान न मिळणें क्रमप्राप्त ठरतें. सहकारी संघटनेनें आणि व्यवहार्य ठरेल अशा ठिकाणीं यांत्रिकीकरण घडवून आणून, ग्रामोद्योगांची उत्पादनक्षमता वाढविता येणें शक्य होईल.

ग्रामोद्योगांना चालना देण्यासाठीं संशोधनाची आवश्यकता अहवालानें प्रतिपादन केली आहे. यंत्रसामुग्री सुधारावयाची, त्यासाठीं करावी लागणारी आयात ही निर्गत व्यापारावर अवलंबून राहणार आणि त्यामुळें ह्या निर्गतीवर औद्योगिक विकासाची गति व परिणाम अवलंबून राहणार हें स्पष्ट आहे. म्हणून, निर्गतीस प्रोत्साहन आवश्यकच ठरतें. भारत सरकारनें ग्रामोद्योगांना दिलेल्या संरक्षणाचा उल्लेख अहवालांत करण्यांत आला आहे व त्या धोरणास पाठिंबा देण्यांत आला आहे.

---

## त्रावणकोर-कोचीनमधील बेकारी

"त्रावणकोर-कोचीन राज्यांतील प्रत्येक १०० पुरुषांपैकीं २५ बेकार आहेत. ह्या २५ पैकीं १२ जण नोकरीच्या शोधांत आहेत, ४ अभ्यास करीत आहेत, ३ जणांना वृद्धावस्थेमुळें काम करणें अशक्य झालें आहे व ६ जणांना कोणतेंच काम नको आहे. कामावर असलेल्या ७५ पुरुषांपैकीं ४४ जणांना स्थायी नोकरी आहे" असे आकडे त्रावणकोर-कोचीन राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं नुकतेच सांगितलें. नोकरीवर असणारांपैकीं ४८% लोकांना लिहितां-वाचतां येते, २३% माध्यमिक शिक्षण झालेले आहेत व ४% लोकांना विद्यापीठांतील शिक्षणाचा किंवा तांत्रिक शिक्षणाचा लाभ झालेला आहे. फक्त २५% साक्षर आहेत.

---


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर.*

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

*—यथावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—*

**श्री. बी. बी. चौधरी,** बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

**श्री. महादेव बाळाप्पा चौगुले** कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## भारतामधील मासळीचा बाजार

भारतीय सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें देशांतील मासळीच्या बाजारपेठांसंबंधीं एक हिंदी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. १९४८ सालीं ह्या विषयासंबंधानें इंग्रजींतून एक अहवाल तयार करण्यांत आला होता; त्याचीच ही संक्षिप्त आवृत्ति आहे. तथापि त्यांतील माहिती मात्र अद्ययावत् करण्यांत आली आहे. मासे खाणाऱ्या लोकांना ह्या अहवालांतील माहिती फारच मनोरंजक वाटेल. गोड्या व खाऱ्या पाण्यांत सांपडणारे व व्यापारी-दृष्ट्या महत्त्वाचे मासे, त्यांची इंग्लिश व प्रमुख देशी भाषांतील नांवें, मासे खूप सांपडण्याचा हंगाम, मच्छीमारीचें साहित्य, इत्यादि विविध तऱ्हेची माहिती अहवालांत ग्रथित करण्यांत आली आहे. भारताचा समुद्रकिनारा विस्तृत असल्यामुळें समुद्रांत ज्या भागांत मासे सांपडूं शकतात असा भाग १,१०,००० चौरस मैलांपेक्षांहि अधिक आहे तथापि, ह्या सर्वच भागांवर मच्छीमारीचा धंदा करण्यांत येतो असें मात्र नाहीं. रात्रींच्या वेळीं हा धंदा करण्याची पद्धत भारतांत जवळ जवळ नाहींच. खोल समुद्रावर जाऊन मासे पकडण्याचे प्रयत्नहि विशेष मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत नाहींत. कारण, मच्छीमारी बोटी अगदींच जुन्यापुराण्या पद्धतीच्या आहेत. गोड्या पाण्यांत वाढणारे व खाण्यास उपयुक्त अशा बऱ्याच जातीचे मासे भारतांत आहेत. पण अशा गोड्या पाण्याच्या जलाशयांपैकीं फारच थोड्यांचा उपयोग माशांच्या निर्मितीसाठीं व संवर्धनासाठीं करण्यांत येतो. भारतांत दरवर्षी सुमारे १४२ लाख मण मासे पकडण्यांत येतात. त्यांपैकीं जवळ जवळ १०० लाख मण मासे समुद्रांतील असतात. मासे सांठवून ठेवण्याचीं व त्यांचीं वहातूक करण्याचीं साधनें अगदीं तोकडीं आहेत. त्यामुळें समुद्रांतील ताजे मासे दूरच्या बाजारपेठांतून पाठविणें शक्य होत नाहीं. मासे टिकविण्याच्या पद्धतींहि फारशा समाधानकारक नाहींत. मासळीच्या धंद्याच्या विविध प्रश्नांकडे मध्यवर्ती व राज्यसरकारें लक्ष देऊं लागलेलीं आहे.

**दिल्ली येथील डी. डी. टी. चा कारखाना**—भारतामधील डी. डी. टी. चा पहिला कारखाना दिल्ली येथें सुरू झाला. कारखान्याच्या बांधणीस १९५३ च्या नोव्हेंबरमध्यें प्रारंभ झाला होता. सध्यां त्यांत रोज अर्धा टन डी. डी. टी. तयार होतें. येत्या नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास कारखान्यांत दररोज २ टन हें कृमिनाशक तयार होईल. कारखाना बांधण्यासाठीं ५१·७५ लाख रुपये खर्च आला.

**रेल्वे-स्टेशनांची पुनर्घटना**—भुसावळच्या नंतर लागणाऱ्या सावदा, निंभोरा व रावेर ह्या तीन रेल्वे-स्टेशनांची पुनर्घटना करण्याचें सेंट्रल रेल्वेनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ६,१५,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. निंभोरा व रावेर ह्या रेल्वे-स्टेशनांत दोन पूलहि बांधण्यांत येणार आहेत. भुसावळ येथील रेल्वेच्या नौकरवर्गासाठीं १,६०,००० रुपये खर्चून ४२ बिऱ्हाडांच्या जागा बांधण्यांत येणार आहेत.

**मध्य प्रदेश सरकारची ज्वारीची खरेदी**—भारतीय सरकारनें मध्य प्रदेश सरकारला सूचना पाठवून, राज्यांतील सहा केंद्रांत त्या राज्य-सरकारनें शेतकऱ्यांपासून ज्वारी खरेदी करावी असा हुकूम काढला आहे. ज्या भागांत ज्वारी पिकते त्याच भागांत ती विकत घेण्यांत येणार असून त्यामुळें शेतकऱ्यांना वाजवी भाव मिळेल. सध्यां भाव ३ रु. ८ आणे मण आहे. सरकार ५ रु. ८ आणे मण भाव देणार आहे.


सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
१९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२१,०००
रिझर्व्ह रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,२६,०७,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.


## मुंबई राज्य सहकारी परिषद्

(२, ३ व ४ एप्रिल १९५५. सोलापूर येथील अधिवेशन)

वरील परिषदेचें उद्घाटन करतांना श्री. बा. गं. खेर म्हणाले:—

"पूर्वी आपण तक्रार करीत होतों कीं, सहकारी चळवळीवर सरकारचें नियंत्रण फार आहे. सहकारी चळवळीची पुनर्घटना करण्याचे कामीं सरकारला अधिकाधिक आस्था वाटावी, हें मला मान्य आहे. पण, सरकारी यंत्रणेच्या लाल फितीमध्यें आपण गुंतले जातां कामा नये, असा इशारा मला द्यावासा वाटतो. ह्या लाल फितीमुळें पुष्कळ वेळां दिरंगाई, उशीर, वशिलेबाजी, निराशा, इत्यादि निष्पन्न होतात. सरकारी अधिकाऱ्यांवर लोकमताचें प्रभावी नियंत्रण राखण्याची पद्धति अद्याप कोठेंच सांपडलेली नाहीं. सहकारी चळवळीची पुनर्घटना करणारांना निरक्षर जनतेच्या गरजा व असहायता, ह्यांची जाणीव आहेच; रूरल क्रेडिट सर्व्हेच्या ४७ व्या प्रकरणांतील निष्कर्ष व आशावाद ह्यांचेशीं मी पूर्णपणें सहमत आहे."

इन्स्टिट्यूटचे चेअरमन, श्री. जनार्दन मदन, आपल्या भाषणांत म्हणाले:—

"पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी योजनाकारांच्या शिफारसींप्रमाणें होत आहे. योजनेमध्यें सहकारी चळवळीस महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे, त्यामुळें ह्या चळवळीस चांगली चालना मिळाली आहे. मुंबई राज्यांत, राज्य सरकारनें दहा सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेसाठीं सवलती व पैसा देण्याचें ठरविलें आहे, हें उदाहरण त्या बाबतींत देतां येईल. प्रवरानगर येथील सहकारी साखरकारखान्याच्या प्रयोगाचें यश व आपण करीत असलेले उपक्रम, ह्यांमुळें नियोजित कार्यक्रमांतील सहकारी यशाचा वाटा वाढत जाईल, अशी आशा आहे. सहकारी चळवळीच्या यशाबद्दल मला अभिमान वाटत असला तरी त्याच्या दुसऱ्या बाजूकडे दुर्लक्ष करण्यास मी तयार नाहीं. सर्व्हेकमिटीनें प्रकाशांत आणलेल्या वस्तुस्थितीचा गंभीरपणें विचार केला पाहिजे. आपल्या कर्तव्याबाबत आपण जागरूक आहोंत, हें परिषदेंतील चर्चेसाठीं निवडलेल्या प्रश्नांत अग्रस्थानीं दिलेल्या विषयावरून लक्षांत येईल. ह्या परिषदेंतील व पाटणा येथील चर्चा ह्यामुळें सहकारी चळवळीचें घर सुधारण्यास मदत होईल व चळवळीच्या प्रगतीची आगेकूच चालू राहील, असा मला विश्वास वाटतो."

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (डो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.